# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# सोपानराव चव्हाण यांच्याकडून अनेक पिढ्यांसाठी कार्य अलौकिक : साळुंखे

## 'ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण' चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** पाटण तालुक्यात निरक्षरतेचा कलंक होता, त्यांच्या कपाळी प्रगतीचा टिळा लावण्याचे पवित्र कार्य डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या माध्यमातून केले. त्यामुळे अनेक पिढ्यांचा उद्धार करण्याचे अलौकिक कार्य झाले आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी व्यक्त केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या डॉ. सोपानराव चव्हाण यांचा ९० वा वाढदिवस तसेच प्रा. डी. डी. चव्हाण यांनी लिहिलेल्या 'ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण' चरित्रग्रंथाचे प्रकाशन सोहळा अशा कार्यक्रमात ते बोलत होते. माजी सार्वजनिक बांधकाममंत्री विक्रमसिंह पाटणकर, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संस्थेचे संचालक डॉ. प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, दादासो जाधव, कवयित्री मीरा चव्हाण, डी. डी. चव्हाण आदी उपस्थित होते.



पाटण येथे 'ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण' चरित्रग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

संजय इंगवले यांनी प्रास्ताविक, प्रा. डॉ. विनायक राऊत व दिनकर माथणे यांनी सूत्रसंचालन तर संस्थेचे संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले. (वा. प्र.)